FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** राधानगरी
FIR No.(प्रथम खबर क्र.): 0396 **Year (वर्ष):** 2025
Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 23/12/2025 23:14

2.

S.No. (अ.क्र.)	Acts (अधिनियम)	Sections (कलम)
1	भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८	7

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
Time Period (कालावधी):
Date From (दिनांक पासून): 19/12/2025
Date To (दिनांक पर्यंत): 23/12/2025
Time From (वेळेपासून): 13:14 बजे
Time To (वेळेपर्यंत): 15:33 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
Date (दिनांक): 23/12/2025 **Time (वेळ):** 22:52 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ):**
Entry No. (नोंद क्र.): 033
Date & Time (दिनांक आणि वेळ): 23/12/2025 22:52 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 30 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** ठिपकुर्ली, कसबा वाळवे,राधानगरी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):
District(State) (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): नंदकुमार श्रीपती पाटील

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1985

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख):

Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड)

S.No. (अ.क्र.)	ID Type (ओळखपत्राचा प्रकार)	ID Number (ओळखपत्राचा क्रमांक)
1		

(h) **Address** (पत्ता):

S.No. (अ.क्र.)	Address Type (पत्याचा प्रकार)	Address (पत्ता)
1	वर्तमान पता	अर्जुनवाडा, ,ताराधानगरी ,राधानगरी,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत
2	स्थायी पता	अर्जुनवाडा, ,ताराधानगरी ,राधानगरी,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

Mobile (मोबाइल नं.): 91-9921486152

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

S.No. (अ.क्र.)	Name (नाव)	Alias (उर्फनाव)	Relative's Name (नातेवाईकाचे नाव)	Present Address (वर्तमान पता)
1	कुलदिप शिवराम जनवाडे			1. 1023 बी,,प्लट नंबर 23, ,ए वार्ड फुलेवाडी रिंगरोड, क्रांतीसिंह नाना पाटील चौक, कोल्हापूर,जुना राजवाडा, कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

S.No. (अ.क्र.)	Property Category (मालमत्ता वर्ग)	Property Type (मालमत्ता प्रकार)	Description (वर्णन)	Value(In Rs/-) (मुल्य (रू.

S.No. (अ.क्र.)	Property Category (मालमत्ता वर्ग)	Property Type (मालमत्ता प्रकार)	Description (वर्णन)	Value(In Rs/-) (मुल्य (रू.
1	नाणे आणि चलन	भारतीय- रुपया	500 रु च्या 54 चलनी नोटा मि.की.स	27,000.00

10 Total value of property (In Rs/-)
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

27,000.00

11.Inquest Report / U.D. case No., if any
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

S.No. (अ.क्र.)	UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.)

12.First Information contents (प्रथम खबर हकीकत):

फिर्याद दिनांक - 23/12/2025

मी उज्वला मारूती भडकमकर वय 38 वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कोल्हापूर मो. नं. 8446153029 समक्ष राधानगरी पोलीस ठाणेस हजर राहून फिर्याद देते की,

दिनांक 19/12/2025 रोजी मला पोलीस उपअधीक्षक वैष्णवी पाटील यांनी फोनकरून कळविले की, तक्रारदार नंदकुमार श्रीपती पाटील, वय 40 वर्षे, व्यवसाय - शेती, रा. अर्जुनवाडा, ता.राधानगरी जि.कोल्हापूर मो. नं. 9921486152 यांचेकडे कसबा वाळवे, ता.राधानगरी येथील मंडळ अधिकारी कुलदिप जनवाडे हे 7/12 पत्रकावर तक्रारदार पाटील यांचे नाव नोंद करणेकरीता, लाच मागणी करत आहेत. तरी तुम्ही तक्रारदार यांचे संपर्कात राहुन, कारवाई करणेसाठी पंच उपलब्ध करुन घेणेस व पुढील कारवाई करणेबाबतचा आम्हास मुखशील आदेश दिला. त्यावेळी आम्ही तक्रारदार पाटील यांना फोन करून, त्यांची तक्रार विचारली असता, त्यांनी त्याची थोडक्यात हकिकत सांगितली की, मी वरील ठिकाणी राहणेस असून मी शेती करतो. मौजे अर्जुनवाडा येथील शेती जमीन गट क्रमांक 479 मध्ये माझे नाव 7/12 पत्रकी लावणे संदर्भात मे.दिवाणी न्यायालय राधानगरी यांचे न्यायालयाने रे.क.नं.147/2025 नि.क.11 बी दिनांक 24/09/2025 अन्वये निर्णय दिलेला आहे. त्याप्रमाणे मी माझे नाव सातबारा पत्रकी नोंद होणेसाठी, सजा-अर्जुनवाडा येथील तलाठी कार्यालयात कागदपत्रे दिलेली होती. त्याप्रमाणे तलाठी यांनी माझे नाव सातबारा पत्रकी लावणेसाठीचे, प्रकरण त्यांचेकडुन मंडळ अधिकारी कसबा वाळवे या कार्यालयात सुमारे एक महिन्यापुर्वी पाठविलेली होती. त्यानंतर मी ब-याच वेळा कुलदिप जनवाडे, मंडळ अधिकारी कसबा वाळवे यांना जावुन भेटुन, त्यांना माझे गट नंबर 479 मध्ये सातबारा पत्रकी नाव नोंदणीचे प्रकरण मंजुर करा म्हणुन सांगितले होते. त्यावेळी त्यांनी प्रकरण मंजुर करतो थोडे दिवस थांब, असे सांगितले होते. तसेच आम्हाला अर्जुनवाडा गावामध्ये गावठाण विस्तार योजनेतुन 1991 साली भुखंड मिळाला असुन, तो भुखंड माझे चुलते बळीराम राजाराम पाटील यांचे नावे आहे. परंतु त्यांचे नाव सदर भुखंडाचे सातबारा पत्रकी नोंद नाही. भुखंडावर चुलते बळीराम राजाराम पाटील यांचे नाव 7/12 पत्रकी नोंद होणेसाठी, योग्य ती कागदपत्रांची मी पुर्तता केली आहे. गावठाण मधील गट नंबर 587 मधील भुखंड क्रमांक 52 वरती माझे चुलते बळीराम पाटील यांचे नाव 7/12 पत्रकी नोंद होणेचे प्रकरणही मी मंडळ अधिकारी कसबा वाळवे जनवाडे साहेब यांचेकडे जमा केले आहे. तसेच माझेप्रमाणे गावातील 1) शंकर/मारूती दौलोबा यादव, 2) श्रीपती दादा यादव, 3) गणपती रामा साबळे यांचेही गावठाण मधील भुखंडाचे प्रकरण मी जनवाडे साहेब यांचेकडे जमा केले आहे त्याचाही पाठपुरावा मी करीत आहे.

दिनांक 15/12/2025 रोजी माझे गट नंबर 479 मध्ये सातबारा पत्रकी नाव नोंदणीचे प्रकरण मंजुर करा म्हणुन, मी जनवाडे साहेब यांना भेटलो. त्यावेळी जनवाडे साहेबांनी गट नंबर 479 मध्ये सातबारा पत्रकी माझे नाव नोंद करणेचे प्रकरण मंजुर करून देतो, त्याकरीता त्यांनी माझेकडे 10,000/- रूपये दयावे लागतील. असे म्हणुन पैशाची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना आता माझ्याकडे पैसे नाहीत, काहीतरी कमी करा असे म्हणालो. त्यावेळी त्यांनी पैसे कमी करण्यास नकार देवुन, अजुन गावठाण मधील तुझ्यासह 04 प्रकरणे आहेत, त्यांची मंजुरी देताना आणि वेगळ करायला पाहीजे असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना पैशाची जुळणा करून एक -दोन दिवसात तुम्हाला भेटतो असे सांगुन, तेथुन निघुन आलो होतो. जनवाडे साहेब माझेकडे 10,000/- रूपये लाच मागत

असल्याची खात्री झाली आहे. परंतु जनवाडे साहेब यांनी मागणी केलेले पैसे देण्याची माझी इच्छा नाही. तरी त्यांचेवर कारवाई करावी म्हणुन तक्रार सांगुन, मी जनवाडे साहेब यांना दिनांक 19/12/2025 रोजी दुपारी 01.00 वा चे सुमारास शेळेवाडी, ता.राधानगरी येथे भेटणेस जाणार आहे. तरी तुम्ही परिते, ता. राधानगरी गावचे हददीत असले कृषी तंत्र महाविद्यालय जवळ या, तेथे मी तुम्हाला भेटुन माझा तक्रारी अर्ज देतो असे सांगितले. त्यावेळी आम्ही तक्रारदार पाटील यांना त्यांनी परिते येथील सांगितले ठिकाणी 10.00 वा चे सुमारास पोहचत असल्याचे सांगुन, तेथे त्यांना हजर राहणेस सांगितले. त्यानंतर मी लागलीच मा. जिल्हा कोषागार अधिकारी कार्यालय कोल्हापूर यांचे कार्यालयातुन लेखी रिपोर्टने दोन शासकीय पंच यांना दिनांक 19/12/2025 रोजी गोपनिय कामकाजाकरीता पाठवावे असे कळविले. दिनांक 19/12/2025 रोजी सकाळी 10.30 वा चे सुमारास दोन शासकीय पंच 01) विराज शेवाळे कनिष्ठ लिपीक, 02) प्रकाश कलकुटकी, लिपीक टंकलेखक असे हजर झाले. त्यानंतर आम्ही, सापळा पथकातील अंमलदार, शासकीय दोन्ही पंच असे सापळा कारवाई करीता आवश्यक असलेली सामुग्री घेवुन, कार्यालयातील अमंलदार उदय पाटील व अधिकारी पोलीस निरीक्षक सानप यांचे खाजगी चार चाकी वाहनातुन कोल्हापूर, इस्पुर्ली, शेळेवाडी, ठिपकुर्ली मार्गे परिते, ता. राधानगरी गावचे हददीत असले कृषी तंत्र महाविद्यालय जवळ रिकाम्या जागी आलो. त्यावेळी तेथे तक्रारदार उपस्थित होते. त्यावेळी मी तक्रारदार पाटील यांना स्टाफ, शासकीय पंच यांचेशी ओळख करून दिली. त्यानंतर माझे सुचनेवरून तक्रारदार पाटील यांनी त्यांची तक्रार पंचाना सांगितली. त्यानंतर तक्रारदार पाटील यांनी त्यांचा तक्रारी अर्ज आमचेकडे दिला. तक्रारदार पाटील यांनी सांगितलेली व लेखी तक्रार एकच असल्याची खात्री झालेनंतर मी, व दोन्ही पंचानी तक्रारी अर्जावर सहया केल्या. तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारदार पाटील व पंच नं.01 शेवाळे यांचेसह प्रथम कुलदिप जनवाडे, मंडळ अधिकारी कसबा वाळवे यांची भेट घेणेकरीता शेळेवाडी येथे पाठवुन,पाटील यांचे तक्रारीप्रमाणे, त्यांचेकडे कुलदिप जनवाडे, मंडळ अधिकारी कसबा वाळवे हे लाचेची मागणी करतात अगर कसे ? याची आपण प्रथम पडताळणी करणार आहोत असे सांगुन, पडताळणी कारवाईचे अनुषंगाने मी संपुर्ण सुचना दिल्या. तसेच शासकीय डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढून त्यामध्ये झक्ड कंपनीचे 8 जीबीचे मायक्रो एसडीएचसी कार्ड (मेमरी कार्ड) पंचाचे समक्ष घालून, रेकॉर्डरचे फोल्डर मध्ये यापुर्वीचे कोणतेही ध्वनिमुद्रीत संभाषण नसलेची तक्रारदार पाटील व पंचाची खात्री करून दिली. तसेच डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू बंद करण्याचे प्रात्यक्षीक दाखविले. त्यानंतर पडताळणी कारवाईचे अनुषंगाने तक्रारदार पाटील व दोन्ही पंचाची निवेदने घेतली. त्यानंतर पडताळणी कारवाईचे अनुषंगाने व्हाईस रेकॉर्डर 13.14 वाजता चालु करून, तो तक्रारदार पाटील यांचे गळ्यात काळ्या दो-याच्या साहयाने अडकवुन, तक्रारदार पाटील व पंच नं.1 शेवाळे यांना कुलदिप जनवाडे, मंडळ अधिकारी कसबा वाळवे यांची भेट घेण्याकरीता तक्रारदार पाटील यांचे मोटर सायकल क्रमांक एमएच 09 बी.जे.4820 वरून पाठविले. त्यावेळी आम्ही सापळा पथक व पंच नं.02 कलकुटकी गाडीत थांबुन राहीलो. तक्रारदार पाटील व पंच नं.1 शेवाळे असे मंडळ अधिकारी जनवाडे यांना भेटुन आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी व्हाईस रेकॉर्डर 14.35 वाजता बंद केला.

त्यावेळी आम्ही प्रथम पंच नं.01 शेवाळे यांना मंडळ अधिकारी जनवाडे यांना भेटणेस गेलेनंतर तेथे काय घडले याबाबत विचारले असता त्यांनी तक्रारदार पाटील यांचे सोबत शेळेवाडी मध्ये गेलो तेथे गेलेनंतर तक्रारदार पाटील यांनी त्यांचे मो.नं.9921486152 वरून स्पिकर फोन ऑन करून मंडळ अधिकारी जनवाडे यांचा मो.नं. 967333535 वरती फोन केला. त्यावेळी जनवाडे यांनी तक्रारदार यांना ठिपकुर्ली गावचे चावडी मध्ये येण्यास सांगितले. त्याप्रमाणे आम्ही ठिपकुर्ली गावी चावडी मध्ये गेलो. तेथे जावुन तक्रारदार यांनी मंडळ अधिकारी चावडीत दिसुन आले नाहीत म्हणुन, तेथे असले लोकांच्याकडे विचारपुस केली. त्यानंतर त्यांनी पुन्हा जनवाडे यांना फोन केला असता, जनवाडे यांनी त्यांना बाहेर शेतात आहे थांबा आलो असे सांगितले. म्हणुन आम्ही तेथेचे थांबुन राहीलो. त्यानंतर पुन्हा तक्रारदार यांनी जनवाडे यांना फोन लावला त्यावेळी जनवाडे यांनी तक्रारदार पाटील यांना इमारती खाली आलो आहे ये असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार हे मंडळ अधिकारी जनवाडे यांना भेटले. त्यावेळी त्यांचेत पाटील यांचे शेती जमीन गट नंबर 479 चे कामाचे अनुषंगाने बोलने झाले. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांना उतारा आवश्यक असल्याचे सांगितले. त्यावेळी लोकसेवक जनवाडे "देवून टाक काय असेल तो, विषय संपवून टाका " असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार पाटील "सांगा की" असे म्हणाले. त्यावेळी मंडळ अधिकारी जनवाडे "दया की दहा हजार, वकीलाला दिलं असते की, पंचवीस, तीस हजार" असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार पाटील "देतो की, परंतु ते जरा जादा होत्यात मी माझा हेणं देवू, तुम्ही हितं किती वेळ हाय" असे म्हणाले. त्यावेळी जनवाडे "आहे मी एक तास भर" असे म्हणाले. त्यानंतर त्यांचेत पुन्हा कामाचे अनुषंगान बोलने झाले. त्यानंतर जनवाडे यांनी तक्रारदार यांना "कणी आणि त्या चार प्रकरणाचे, गावठाणचे" असे विचारले. त्यावेळी तक्रादार पाटील यांनी "पुर्ण विषय करून टाकूया" असे म्हणाले. त्यावेळी जनवाडे " मागचं 20 ठरल्याचं, वरण आलं की 20 दयायचं" असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार पाटील "किती घेवून येवू, विषय पुरा करून टाकूया" असे म्हणाले. त्यावेळी जनवाडे "ते

आता आपलं काम काय हाय, ठरल्यालं आपलं वीसणं करायचं" असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार पाटील "हे माझं झालं सातचा विषय" असे म्हणाले. त्यावेळी जनवाडे "तुझं नाही रे, हे हे चार हुती ना गावठाणची, चौघांची चाळीस हजार रूपये सांगितलेलं कणी" असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार पाटील " मला विषय सांगा" असे म्हणाले. त्यावेळी जनवाडे "वीस दयायचे" असे म्हणाले त्यावेळी तक्रारदार पाटील "मी एक तासाभरात येतोय हं" असे म्हणाले. त्यावेळी जनवाडे यांनी त्याला अर्धातासात ये असे म्हणाले त्यानंतर मी व तक्रारदार पाटील तेथुन निघुन, आपले जवळ आलो आहे असे सांगितले. त्यानंतर आम्ही तक्रारदार पाटील यांना मंडळ अधिकारी जनवाडे याना भेटण्यास गेले नंतर काय हकीकत घडली याबाबत विचारले असता त्यांनी पंच नं. 1 शेवाळे यांचे मिळतीजुळती हकीकत सांगितली.

पंच शेवाळे व तक्रारदार पाटील यांचेकडुन हकीकत ऐकुण व्हाईस रेकॉर्डमधील रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकले असता, तक्रारदार पाटील यांचेकडे मंडळ अधिकारी जनवाडे हे तक्रारदार पाटील यांचे स्वतःचे अर्जुनवाडा येथील शेतजमीन गट क्रमांक 479 मध्ये 7/12 मध्ये नाव नोंदविणेचे प्रकरण मंजुर करणेकरीता 10,000/- रूपयांची मागणी करून त्यापैकी तडजोडी अंती 7,000/- रूपये लाचेची मागणी केली. तसेच अर्जुनवाड गावठाण मधील इतर गट नंबर 587 मधील भुखंड क्रमांक 52 वरती चुलते बळीराम पाटील यांचे तसेच अन्य तीन लोकांचे नावे 7/12 पत्रकी नोंद होणेची चार प्रकरणे, मंजुर करणेकरीता 20,000/- रूपये आता व काम झाल्यावर 20,000/- रूपये अशी 40,000/- रूपयांची मागणी करून त्यापैकी आता 20,000/- रूपये लाचेची मागणी केली. अशी एकुण 27,000/- रूपयांची लाच मागणी केल्याचे निषन्न झाले. त्यानंतर आम्ही पुढील कारवाई करणेकरीता सापळा पथक, पंच व तक्रारदार यांना सुचना देत असतानाच, तक्रारदार यांना त्यांचे मोबाईल नंबर वरती मंडळ अधिकारी जनवाडे यांचा मो.नं.967333535 वरून मिस कॉल आला. म्हणुन आमचे सुचनेवरून तक्रारदार पाटील यांनी जनवाडे यांना फोन केला. त्यावेळी जनवाडे यांनी तक्रारदार यांना ते निघुन गेले असुन, काय गडबड करू नको यायला, मी सांगतो कधी यायच ते असे म्हणुन फोन बंद केला. तक्रारदार यांचेकडे मंडळ अधिकारी जनवाडे यांनी लाच मागणी केल्याचे निषन्न झालेने, त्यांचा तक्रारदार यांना निरोप किंवा फोन आलेनंतर, पुढील सापळा कारवाई करण्याचे सर्वामते ठरवुन चालु कारवाई तात्पुरती स्थगित केली.

त्यानंतर आम्ही तक्रारदार पाटील यांचे संपर्कात सतत राहुन, कारवाईचे अनुषंगाने माहिती घेत होतो. दिनांक 23/12/2025 रोजी आम्ही तक्रारदार पाटील यांना फोन करून विचारले असता, त्यांनी मंडळ अधिकारी जनवाडे यांनी त्यांना आज दुपारी 01.00 वा चे सुमारास मंडळ अधिकारी कार्यालय कसबा वाळवे येथे मला बोलविले आहे. तरी तुम्ही मागच्या वेळी थांबलेल्या ठिकाणी या असे सांगितले. त्यानंतर आम्ही शासकीय दोन्ही पंच व सापळा पथक असे आमचे खाजगी चार चाकी वाहनातुन तसेच अंमलदार पाटील हे त्यांचे मोटर सायकल वरून वाशीनाका, हळदी, कुरूकली मार्गे परिते, ता. राधानगरी गावचे हददीत असले कृषी तंत्र महाविद्यालय जवळ रिकाम्या जागी आलो. त्यावेळी तेथे तक्रारदार उपस्थित होते. त्यावेळी आम्ही सर्वांना मंडळ अधिकारी जनवाडे यांनी तक्रारदार पाटील यांचेकडे लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने, त्यांचेवर सापळा कारवाई आयोजीत करणार असल्याचे सांगितले.

सापळा कारवाईचे अनुषंगाने आम्ही सर्वांना सर्व सुचना दिल्या. त्यानंतर मी तक्रारदार पाटील यांना लाच रक्कम बाबत विचारणा केली, त्यावेळी त्यांनी त्यांचेकडील 500/- दराच्या 54 चलनी नोटा अशी 27,000/- रूपये लाच रक्कम उपलब्ध केली. त्यानंतर मी तक्रारदार पाटील व पंचाना अॅथ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावुन, अल्ट्रा व्हायलेट दिव्याचे प्रकाशात हिरवट रंगाची चकाकी दिसलेबाबत खात्री करून दिली. त्यानंतर सापळा कारवाईचे अनुषंगाने सापळा पुर्व संपुर्ण कार्यवाही, तसेच सापळा कारवाईचे अनुषंगाने तक्रारदार पाटील व दोन्ही पंचाचे निवेदने घेतली. त्यानंतर अॅथ्रासिन लावलेले 27,000/- रूपये तक्रारदार यांचे पॅन्टचे उजव्या बाजुच्या पुढील खिशात ठेवले. त्यानंतर तक्रारदार पाटील, दोन्ही पंच व सापळा पथकास सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना दिल्या. तसेच तक्रारदार पाटील यांना मंडळ अधिकारी जनवाडे यांनी लाचेची रक्कम स्विकारलेनंतर त्यांनी त्याचा हातरूमाल डाव्या हाताने तोंडावरून, फिरविणेचा पुर्वनियोजीत इशारा करणेचा आहे असे सांगितले. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर 14.06 वाजता सुरू करून, तो तक्रारदार पाटील यांचे शर्टचे आतमध्ये काळे दो-याचे साहयाने गळयात अडकवला. त्यानंतर तक्रारदार पाटील व पंच नं.1 शेवाळे असे त्यांचे मोटर सायकलने आम्ही थांबलेल्या ठिकाणाहुन, कसबा वाळवे गावाकडे निघाले. त्यावेळी त्यांचे पाठोपाठ मी, सापळा पथक, पंच नं.2 शेळके असे आमचेकडील चारचाकी वाहनातुन, तसेच मोटर सायकलवरून तक्रारदार यांचे पाठोपाठ कसबा वाळवे येथे आलो. त्यावेळी तक्रारदार पाटील व पंच नं.1 शेवाळे असे मंडळ अधिकारी कार्यालय कसबा वाळवे येथे कार्यालयात गेले. आम्ही मंडळ अधिकारी कार्यालयाचे आजुबाजुला सापळा लावुन थांबलो. तक्रारदार पाटील यांनी मंडळ अधिकारी जनवाडे यांनी पैसे स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजीत इशारा केला असता मी, पंच नं.02 कलकुटकी व स्टाफ तेथे गेलो. तक्रारदार

पाटील यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर 15.33 वाजता बंद करून, तात्काळ लाच स्विकारलेल्या रक्कमेसह मंडळ अधिकारी जनवाडे यांना पकडले. त्यावेळी आम्ही तक्रारदार व पंच यांना सापळा कारवाईवेळी काय हकीकत घडली असे विचारले असता, त्यांनी सांगितले की, तक्रारदार पाटील व मंडळ अधिकारी जनवाडे हे पाटील यांचे कामाचे अनुषंगाने बोलले. त्यावेळी तक्रारदार पाटील ते सात, आणि हे वीस सत्तावीस हाईत, अजून मोजूण घ्या, असे म्हणुन, जनवाडे यांनी मागणी केलेली लाच रक्कम 27,000/- रूपये त्यांचेकडे दिली. त्यावेळी जनवाडे यांनी सदर लाच रक्कम स्विकारून, त्यांचे पॅन्टचे डावे बाजुचे पुढील खिशात ठेवली. त्यावेळी जनवाडे नाय असू दे, विश्वास आहे. असे म्हणाले. त्यानंतर पुन्हा त्यांचेत कामाचे अनुषंगाने बोलने झाले. त्यावेळी तक्रारदार यांनी मंडळ अधिकारी जनवाडे यांनी लाच रक्कम स्विकारलेनंतरचा इशारा केला असल्याचे सांगितले. सदर ठिकाणी लाचेच्या सापळ्यातील प्राथमिक तपासण्या केल्या. त्यावेळी मंडळ अधिकारी जनवाडे यांचे दोन्ही हाताचे बोटांना अंथा◌ृरसीन पावडरची हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. तसेच त्यांचे अंगावरील पॅन्टचे डावे बाजुचे पुढील खिश्यात व खिश्याचे कडास अॅथा◌ृरसीन पावडरची हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. सदर ठिकाणचे व्हिडीओ शुटींग स.पो.फौ प्रकाश भंडारे यांनी केले आहे. सदर ठिकाणी तक्रारीचे अनुषंगाने आवश्यक असणारी कागदपत्रे ताब्यात घेतली. त्यानंतर पुढील सर्व कार्यवाही राधानगरी पोलीस ठाणे येथे पुर्ण करण्यात आली आहे.

तरी यातील मुळ तक्रारदार नंदकुमार श्रीपती पाटील यांचे अर्जुनवाडा येथील शेती जमीन गट क्रमांक 479 मध्ये त्यांचे नाव 7/12 पत्रकी लावणे करीता, मंडळ अधिकारी कुलदिप जनवाडे यांनी तक्रारदार यांचेकडे 10,000/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती 7,000/- रूपय◌ाची मागणी केली. तसेच तक्रारदार पाटील पाठपुरावा करीत असले, मौजे अर्जुनवाड गावठाण मधील गट नंबर 587 मधील भुखंड क्रमांक 52 वरती त्यांचे चुलते बळीराम पाटील यांचे नाव 7/12 पत्रकी नोंद होणेचे प्रकरण, तसेच गावातील 1) शंकर/मारूती दौलोबा यादव, 2) श्रीपती दादा यादव, 3) गणपती रामा साबळे यांचेही गावठाण मधील भुखंडावरती 7/12 वरती नाव नोंद करणेकरीता दिलेल्या इतर चार कामासाठी 40,000/- रूपये लाच मागणी करून त्यापैकी आता 20,000/- रूपये दयावे लागतील, असे म्हणुन तक्रारदार यांचेकडे एकुण 27,000/- रूपयांची लाचेची बेकायदेशिरपणे मागणी करून मागणी केलेली 27,000/- रूपये लाच रक्कम तक्रारदार पाटील यांचेकडुन, बेकायदेशीरपणे व अप्रामाणिकपणे स्विकारताना त्यांना आम्ही व सापळा पथकाने पकडले आहे. म्हणुन माझी कुलदिप शिवराम जनवाडे, वय - 47 वर्षे, पद - मंडळ अधिकारी कसबा वाळवे, ता. राधानगरी, जि.कोल्हापूर रा. 1023 बी, प्लॉट नंबर 23, ए वार्ड फुलेवाडी रिंगरोड, अरूण सरनाईक नगर, क्रांतीसिंह नाना पाटील चौक, राजर्षी शाहु हायस्कुल मागे कोल्हापूर यांचेविरूध्द माझी फिर्याद आहे.

माझा वरील वर्दीजबाब मी सांगितले प्रमाण,े संगणकावर टंकलिखित केलेला असून, तो मी वाचून पाहिला असता बरोबर आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

SANTOSH SHIVAJI GORE(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

Rank (पद): **No.(क्र.):**

to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):

on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

UMBhadarkar

Signature of Officer in charge, Police Station
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): SANTOSH SHIVAJI (

Rank(पद): I (Inspector)

No.(सं.):

पोलीस ठाणे अमलदार
राधानगरी पोलीस ठाणे
जिल्हा – कोल्हापूर